महानगरपालिका / नगरपरिषदेमधील अग्निशमन विभागात "फायरमन" पदावर नियूक्ती करताना एकूण पदांच्या ५% पदे होमगार्ड मध्ये कमित कमी ३ वर्षे सेवा झालेल्या उमेदवारांसाठी राखीव ठेवणेबाबत..

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग,

शासन निर्णय क्र:- अशसेके- १००६/५६/प्र.क्र.-२४/०६/नवि-२४

मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक :- ५ फेब्रुवारी,२००८

प्रस्तावना :- राज्यात पूर, अपघात तसेच आणिबाणीच्या प्रसंगी शासन यंत्रणेला होमगार्ड्स संघटनेचे सहाय्य मिळते. या संघटनेतील स्वयंसेवकांना (होमगार्डसना) विमोचन, अग्निशमन प्रथोमचार तसेच अपघातात शुश्रुषा करण्याचे व सार्वजनिक आरोग्य प्रशिक्षण दिले जात असून त्याना आर्थिक पाठबळ तसेच त्यांच्या सेवेची योग्य ती दखल घेतली जात नसल्यामुळे होमगार्डस् संघटनेस स्वयंसेवक उपलब्ध होत नसल्याने शासकीय सेवेतील गट "क" व गट "ड" मधील कॉस्टेबल, फायरमन, वनरक्षक सारख्या पदावर स्वयंसेवकानी होमगार्डची ३ वर्षे सेवा केली त्यांना सेवेत प्राधान्य द्यावें असे केंद्र शासनाचे निर्देश आहेत. या निर्देशा नुसार राज्य शासनाने कमीत कमी ३ वर्षे सेवा झालेल्या होमगार्डसना, पोलिस भरती , फॉरेस्ट गार्ड , फायरमन व ट्रफिक वार्डन या पदाच्या भरतीमध्ये ५% आरक्षण ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेता नगर विकास विभाग अंतर्गत महानगरपालिका /नगरपरिषदा /सिडको, इतर शासकीय कार्यालयामध्ये फायरमन पदावर नियुक्ती करताना एकूण पदाच्या ५% पदे होमगार्डसाठी आरक्षित ठेवावयाची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :- राज्यातील महानगरपालिकांमधील / नगरपरिषद सिडको व इतर कार्यालयातील अग्निशमन विभागातील "फायरमन" पदावर नियुक्ती करताना एकूण पदाच्या ५% पदे होमगार्डस मध्ये कमीत कमी ३ वर्षे इतकी सेवा झालेल्या व फायरमन पदासाठी आवश्यक शैक्षणिक /शारिरीक पात्रता पूर्ण करणा-या व विहीत वयोमर्यादेतील तसेच विहीत पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणा-या होमगार्डसमधून भरण्यात यावीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार,

( र. सि. पाटगे )

कार्यासन अधिकारी

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

२) मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे स्वीय सहाय्यक.

३) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

४) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

(कृ.मा.प.)